PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 3, ISSUE 3

# प्राचीन काळातील पोलीस व्यवस्था

**उमाकांत सुधाकर दंडगव्हाळ**
सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक
बी. सी. एस., एम. ए., एम. फील.
इतिहास विभाग
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
पुणे ०७ महाराष्ट्र भारत

**राज्याची निर्मीती :**राज्या विषयी आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये एक विशेष अशी धारणा आहे. यातूनच आपणास राज्याची निर्मीती का झाली? व कशी झाली? याची माहीती मिळते. महाभारतात युधिष्टिराने भीष्माचार्यांना विचारले होते की , 'विश्वात राजा हा शब्द प्रचलीत आहे परंतु याची निर्मीती कशी झाली '. यावर भीष्मचार्यांनी सांगीतले कि "न वै राज्यं न राजाऽ सीत न दण्डो न च दाण्डिकः.धर्मिणेव प्रजः सर्वा रक्षन्ति स्म परस्परम" याचा अर्थ सुरुवातीला न राज्य होते न राजा. न दंड होता न दंड करणारी, दंड देणारी व्यवस्था. सर्व लोक धर्मानुसार आचरण करत असत तसेच परस्परांची काळजी घेत असत व एकमेकांची सुरक्षा देखील करीत असत. भीष्माचार्यांनी दिलेल्या या उत्तरावर युधिष्टिराने पुन्हा प्रतिप्रश्न केला की 'मग राजा व राज्य का निर्माण झाले'. यावर भीष्माचार्यांनी समजावून सांगितले की कालमानानुसार धर्माची शक्ती कमी होत गेली. पुढे नैतिक अधःपात होऊ लागल आणि स्वार्थांध लोक परस्परात भांडू लागले. जंगली अंमल सुरु झाला. लहान माशाल मोठा मास खातो ,त्याप्रमाणे दुर्बल लोकांचा प्रबल लोक संहार करु लागले व सर्वत्र अराजकता माजली.यालाच मत्स्यन्याय म्हणतात.त्यामूळे त्रस्त झालेल्या पृथ्वीवरील लोकांचे एक शिष्टमंडळ जेव्हा ब्रम्हदेवाकडे गेले त्यांनी ब्रम्हदेवाकडे राजाची मागणी केली, ब्रम्हदेवाणे लोकांची मागणी पूर्ण केली व राजा नेमला.देवाने विश्वाची निर्मिती केली आहे. तशीच राजाची निर्मीतीही त्यानेच केली आहे. राजा अथवा कायदा यांच्या अस्तित्वाशिवाय समाजाला सरुवात झाली देवांनादेखील यातून कसा मार्ग काढावा याची विवंचना पडली होती. तेव्हा ब्रम्हदेवाने मानवजातीचे संरक्षण करण्यासाठी कायदा करण्याची कामगिरी मनुकडे सोपविली. अशा रीतीने प्रजेचे संरक्षण करणे हे राजाचे 'दैवनियामक' म्हणजे देवाने प्रसृत केलेले कर्तव्य ठरले. ज्या देशात राजा नाही त्या देशाला सुरक्षितता नाही आणि म्हणून या देशाचे कल्याण होणार नाही. प्रजेचे संरक्षण करणे एवढीच राजाची जबाबदारी नसून ,प्रजेच्या हितासाठी भरीव कामगिरी करणे हेदेखील राजाचे आद्यकर्तव्य मानले जात असे. याचाच अर्थ असा की लोकांच्या मागणीनुसार त्यांना राजा मिळाला. लोकांना राजा मिळाल्यानंतर त्याने राज्याची निर्मीती केली. अर्थात राज्य जसे जनतेकरीता आहे तसेच ते धर्माच्या -हासामूळे जी कमतरता निर्माण होते, त्याच्या पुर्ततेकरीता देखील आहे. अशी धारणा आहे की धर्म हा चार पायांचा एक वृषभ(बैल) आहे. कृतयुगात तो चार पायांवर उभा होता , परंतु त्रेता युगात त्याचा एक पाय मोडला, त्याची पुर्तता राज्य अर्थात दंड शक्तीने पूर्ण केली. व्दापार युगात धर्मरुपी वृषभाचा दुसरा पाय देखील गेला , म्हणजेच धर्म अर्धाच उरला याची देखील कमतरता राज्य शक्तीने भरुन काढली. कलियुगात या धर्मरुपी वृषभाचा तिसरा पाय देखील गेला आणि ही कमतरता देखील राज्य शक्तीने भरुन काढली. कलियुगात इतक्या जास्त प्रमाणात कायदे-कानून का आहेत , रोज नवनविन कायद्यांची निर्मीती का होत आहे. याचे मर्म आपणास उपरोक्त गोष्टीत समजू शकते. लोक धर्माप्रमाणे आचरण करीत नाहीत, धर्माचे रक्षण करित नाहीत. याकरिताच दंडाची भिती दाखवून त्यांना नियमित केले जाते. स्वाभविकच राज्य आले की नियम व कायदे आपोआपच येतात आणि नियमांचे व कायद्यांचे पालन जनतेकडुन करुन घेण्याकरीता दंड शक्तीचा उदय झाला. दंडशक्तीचे महत्वाचे अंग असलेल्या पोलीस व्यावस्थेचा देखील उदय झाला. परंतु या दंडशक्तीचा उपयोग कोणत्या कामा करिता केला पाहिजे ? दृष्टांचा संहार व सज्जनांचे रक्षण करण्याकरिताच दंड शक्तीचा उपयोग झाला पाहिजे म्हणजेच 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' आणि हेच आहे महाराष्ट्र पोलीस दलाचे ब्रिद वाक्य.

महाकवी कालीदास यांच्या 'अभिज्ञान शाकुंतलम' या नाटकात राजा दुष्यंत यास ऋषिकुमार सांगतो की हे राजा ,आपले शस्त्र हे दुर्बलांचे रक्षण करण्यासाठी आहे. निरपराधांना मारण्याकरिता नाहीत. रघुवंशीय राजांची विशेषता सांगतांना कालिदासांनी लिहीले आहे की 'राजा यथा परधदंड '. अर्थात त्यावेळचे राजे हे अपराध्यांना त्यांनी केलेल्या गुन्ह्यांच्या प्रमाणात

शिक्षा,दंड करत असत. आपल्या प्राचीन काळातील राज्य व्यवस्थेमध्ये 'दंडाचे' महत्व सर्वांना माहित होते. शिक्षा ठोठावण्यात आलेल्या अपराध्यांना ठेवण्याकरिता बंदिगृहांची देखील व्यवस्था त्याकाळात होती. परंतु राज्याची दंडशक्ती इतकी प्रभावी असे की कारागृह हे बहूदा रिकामेच असत. माझ्या राज्यात कुणी चोर नाही , कुणी कंजुष नाही. कुणी मद्यपी वा दुराचारी नाही या गोष्टीचा गर्व राजाला असे. छांदोग्य उपनिषदा नुसार राजा अश्वपती याने ज्ञानाची याचना करण्याकरिता आलेल्या ब्राम्हंणांना उ-ेशून म्हटले आहे की माझ्या राज्यात ना कुणी चोर आहे, ना कुणी कंजुष. ना कुणी मद्यपी , धर्माची उपासना न करणारा देखील कुणी नाही. ना कुणी मुर्ख आहे ना कुणी व्याभिचारी आहे. त्यामूळे व्याभिचारणी तरी कोठून येणार. प्राचीन काळात प्रत्येक राजा सर्वतोपरी आपल्या प्रजेचे कल्याण करणे , रक्षा करणे आपले कर्तव्य मानीत असे. धर्मानुसारच त्याचे वागणे व व्यवहार असे.

'रघुवंश' या कालीदास रचित महाकाव्यात राजा दिलीपचे वर्णन करतांना कालीदासाने म्हटले आहे की राजा प्रजेची शिक्षा-दिक्षा , पालण पोषण तसेच रक्षा करीत असे. त्यामूळेच प्रजा राजास आपला पिता मानित असे. राजा जरी प्रजेची सर्वतोपरी काळजी घेत असे परंतु जर कुणी अपराध केला तर त्या व्यक्तीस दंड देखिल केला जात असे. राजास अपराधानुसार अपराध्यास दंड देणारा असले पाहिजे अशी मान्यताच होती. तसेच निरपराध्यास शिक्षा व्हायलाच नको. महाभारतात राजाचे महत्व विस्ताराने सांगितले आहे. शांतिपर्वात ६८ व्या अध्यायात राज्य आणि राजा असल्यामुळे किती जनकल्याण होते याचे वर्णन आपणास पहावयास मिळते. त्यातील एका श्लोकाचा अर्थ पुढिल प्रमाणे आहे. राजा जर आपल्या प्रजेची सुरक्षा उत्तम प्रकारे करीत राहीला व त्यामूळे राज्यात सुरक्षितता असेल तर अशा राज्यात अनेक दागदागीने अभुषने घातलेली महिला कुनालाही आपल्या सुरक्षेकरिता बरोबर न घेता राज्यातील रस्त्याने सहजरित्या न घाबरता वावरु शकेन. अशा या उत्तम राज्य व्यवस्थेची अट आजच्या युगातील लोकशाही राज्यात देखील लागू होते. महिलेचे उदाहरण देऊन सांगितले आहे की राज्यात चोर,गुंड तसेच गुन्हेगार प्रवृत्तींना मोठी दहशत पाहिजे. तसेच असामाजिक तत्वांना कोठेही थारा नसावा. हे सर्व साध्य करण्याकरिता उत्तम पोलीस व्यवस्था असणे जरुरीचे आहे. हे सर्व प्रचीन काळात साध्य होत होते ते त्या काळातील धर्माचरण करणाया प्रजेमुळे, प्रजेचे हित जोपासणाया राजामूळे व त्याकाळातील पोलीस व्यवस्थेमूळे.

**प्राचीन काळातील पोलीस व्यवस्था :** मानवाने स्वतःला व इतरांना शिस्तबद्ध तसेच चांगल्या पद्धतिचे जीवन जगता यावे म्हणून धर्म, नितीमुल्ये, तत्वज्ञान , नियम व कायदे यांचा शोध लावला , निर्मीती केली. राज्य तसेच राजकिय संस्थांचा , प्रशासन व्यवस्थेचा जन्म झाला. नागरिकांच्या जीवीताची तसेच मालमत्तेची सुरक्षा करणे तसेच परकिय शत्रु पासून प्रजेचे सरंक्षण करणे हे कुठल्याही राजाचे महत्वाचे कार्य असे. राज्य प्रशासनाने आपल्या प्रजेकरिता धर्माचरण, नियम व काही कायदे देखिल तयार केले. राज्यात ,समाजात शांतता नांदावी , राज्यात प्रजा सुरक्षित रहावी, गुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांनी गुन्हे करु नयेत तसेच त्यांच्यावर अंकुश असावा आणि राज्यात शांतता नांदावी हे सर्व साध्य करण्याकरीता राज्यात पोलीस व्यवस्थेची निर्मीती झाली. पोलीस व्यवस्था हे राज्य प्रशासनाचे महत्वाचे अंग तयार झाले. प्राचीन काळात पोलीस व्यवस्था अस्तित्वात होती मात्र आजच्या काळात जशी पोलीस व्यवस्था आहे तशी फक्त पोलीस व्यवस्थेचेच कार्य करणारी गणवेशधारी पोलीस व्यवस्था त्याकाळात अस्तित्वात नव्हती. त्याकाळात गुप्तहेर, सैनिक यांच्याकडूनच पोलीस व्यवस्थेची कामे करुन घेतली जात होती.

पोलीस व्यवस्थेला आरक्षी, रक्षक, आरक्षक अशा वेगवेगळ्या नावाने ओळखले जात असे. आजच्या काळात देखील भारतातील काही राज्यात पोलीसांना आरक्षी, आरक्षक म्हणून संबोधले जाते. 'पोलीस' हा शब्द आठराव्या शतकात फ्रान्स मधून इंग्लंड मध्ये आयात झालेला आहे. ज्या इंग्रजांनी भारतात आधुनिक पोलीस व्यवस्था सुरु केली त्यांच्या देशात इग्लंड मध्ये देखील अठराव्या शतकाच्या दुसया अर्धशतकापर्यंत नियमित अशी पोलीस व्यवस्था नव्हती. अठराव्या शतकाच्या शेवटच्या काळात मोठ्या शहरांमध्ये पगारी सुरक्षा रक्षक / वॉचमन ठेवण्यास सुरुवात झालेली होती. इ.स. १७९२ मध्ये लंडन शहरामध्ये शिपायांचे वेतनधारी असे दल पोलीस व्यवस्थेच्या कार्याकरीता स्थापन करण्यात आले होते. परंतु अशा प्रकारच्या दलास तेथिल नागरिकांचा मोठा विरोध होता. इ.स.१८१८ साली इंग्लंड मध्ये संसदीय कमिटीने स्वतंत्र देशात पोलीस व्यवस्था कशा करीता असावी ,याबल आपल्या भावना लोकांसमोर मांडल्या. त्यांनी लोकांना पटवून सांगीतले की कल्याणकारी राज्याकरीता ,मानवी हक्कांचे सरक्षण करण्याकरीता आणि आपल्या सुरक्षेकरीता कॉन्स्टेबल्स-शिपायांच्या दलाची आवश्यकता लोकांना पटविण्याचा प्रयत्न केला. अशा ह्या तणावाच्या वातावरणात एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवारतीस सर रॉबर्ट पिल यांच्या अध्यक्षतेखाली कमिटीने लंडन शहरा करीता व उपनगरांनकरीता पोलीस दल स्थापन करण्याची शिफारस केली. इ.स.१८२९ मध्ये सर रॉबर्ट पिल यांच्या समितीने केलेल्या शिफारशीची पुर्तता करण्याकरीता संसदेत मेट्रोपोलीटन पोलीस ॲक्ट मंजूर करण्यात आला. अशाप्रकारे इ.स.१८२९ मध्ये जेंव्हा प्रसिद्ध पोलीस ॲक्ट इंग्लंडच्या पार्लमेंटने मंजूर केला तदनंतर इग्लंडमध्ये पोलीस व्यवस्था सुरु करण्यात आली.

भारतीय पोलीस व्यवस्थेला साडेतीन हजार वर्षांची गौरवशाली परंपरा असली तरी वर्तमानकाळात जी आधुनिक पोलीस व्यवस्था आहे तिची स्थापना मात्र ईस्ट इंडिया कंपनीच्या राजवटी मध्ये करण्यात आली. ईस्ट इंडिया कंपनीचे पहिले गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्ज याने दि. ९ एप्रिल १७७४ रोजी पोलीस व्यवस्था सुरु करण्यविषयीचे आपले विचार प्रथम भारताच्या भूमिवर व्यक्त करुन कलकत्ता - बंगाल प्रांतात आधुनिक पोलीस व्यवस्थेची बीजे रोवली. पुढे पाच वर्षानंतर दि. १७ फेब्रुवारी १७७९ रोजी मुंबई बेटावर अस्तित्वात असलेल्या भंडारी (मिलीशिया) ब्रिगेडचे नामांतरण बाँम्बे पोलीस (मुंबई पोलीस) असे करण्यात आले. लॉर्ड वेलस्लीने इ.स.१८०१ मध्ये कलकत्ता इलाख्यामध्ये , लॉर्ड बेंटिकने इ.स.१८१३ मध्ये मद्रास इलाख्यामध्ये तर बाँम्बे प्रेसिडेन्सीचे तत्कालीन गव्हर्नर एलफिन्स्टन यांनी दि.१ जानेवारी १८२७ रोजी बॉम्बे प्रेसिडेन्सी मध्ये आधुनिक पोलीस व्यवस्थेची सुरुवात केली. [१] भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर बॉम्बे प्रेसिडेन्सी रुपांतर बॉम्बे स्टेट मध्ये करण्यात आले व नंतर इ.स.१९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर महाराष्ट्र राज्याच्या पोलीस व्यवस्थेस "महाराष्ट्र पोलीस" संबोधण्यात येऊ लागले.

पोलीस हा शब्द शहर किंवा नगरराज्य आणि राज्याची परिस्थिती व राज्यघटना या अर्थाच्या ग्रीक ( ग्रीक शब्दावरुन Polis हे त्याचे रोमन लिप्यंतर) शब्दापासून निघालेला असून तो मुलकी राज्यव्यवस्था या अर्थाने प्रथम फ्रेंच भाषेमध्ये रुढ झाला. सर्व पाश्चिमात्य राष्ट्रांत प्राचीन काळापासून नगरपालिका आणि तत्समान इतर स्थानिक स्वराज्य संस्थाच कायदा व सुव्यवस्था राखण्याचे काम करीत असल्यामुळे कालांतराने पोलीस या शब्दाला आधूनिक अर्थ प्राप्त झाला. लोकांच्या जीविताचे रक्षण करणे,गुन्ह्यांना आळा घालणे,घडलेले गुन्हे हुडकुन काढून आरोपीला पुराव्यानिशी न्यायासनासमोर हजर करणे, समाजात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करणे इ. कामांचा समावेश पोलीसांच्या कर्तव्यांत होतो. [२]

प्राचीन काळात पोलीस व्यवस्थेची कामे ही सैनिकांकडून , महसुल व्यवस्थेचे कार्य करणाया कर्मचायांकडून केली जात असे.प्राचीन भारतीय इतिहासात आपणास काही राज्यात पोलीस व्यवस्थेकरीता काही अधिकारी नेमल्याचे निदर्शनास येते. परंतु आपणास इतिहासाद्वारे जे पुरावे भेटतात त्यातून पोलीस व्यवस्थेचे काम पहाणारे अधिकारी व सैनिक यांचे कार्ये वेगवेगळी करता येत नाहीत.[३]

**मौर्यपुर्वकालीन राज्यव्यवस्था :** राजा हा राज्याचा प्रमुख असे.प्रजेचे रक्षण करणे , कर गोळा करणे व राज्याचा कारभार सुरळीत चालवणे ही राजाची मुख्य कर्तव्ये होती. राजाच्या सत्तेवर नियंत्रण ठेवण्यासाठी वैदिक काळात सभा आणि समिती अशा दोन संस्था होत्या त्यांना प्रजापतीच्या कन्या म्हटले जाइे. राज्यातील जेष्ठ व्यक्तींच्या मंडळास सभा म्हणत , तर लोकांच्या सर्वसाधारण बैठकीस 'समिती' असे म्हणत. आपल्या प्रदेशाचा कारभार सुरळीतपणे चालण्यासाठी राजाच्या मदतीकरीता विविध अधिकारी असत. 'ग्रामणी' हा गावचा प्रमुख अधिकारी असे. 'ग्रामवादी' हा अधिकारी ग्रामणीच्या मदतीने न्यायनिवाडा करण्याचे काम पहात असे. अनेक गावांच्या समुहास 'विष' असे म्हणत व त्यावरील अधिकायाला 'विषपती' असे म्हणत. पुरोहीत व सेनापती हे महत्वाचे अधिकारी होते. राज्यकारभाराकरीता लागणारा पैसा कररुपाने गोळा केला जात होता.

**मौर्यपुर्वकालीन पोलीस व्यवस्था :** भारतीय इतिहासात अपाणास पोलीस व्यवस्था ही वैदिक काळा पासुन पहावयास मिळते. ऋग्वेदात चोर आणि दरोडेखोराचे (तयास किंवा सत्यास) तस्करचे वर्णन आपणास आढळते. ऋग्वेद व अथर्व वेदात गुन्हे आणि शिक्षा याबलचा उल्लेख आढळतो महाकाव्य रामायणात देखील त्याकाळी आपणास शांतता व्यवस्था तसेच रहदारी नियंत्रित करण्याकरिता पोलीस व्यवस्था आढळते. जेंव्हा प्रभु रामचंद्र वनवासातून आयोध्या नगरीत परत आले त्यावेळी अंथाग जनसागर त्यांच्या स्वागताकरीता ,त्यांना बघण्याकरीता व त्यांच्या दर्शनाकरीता जमला होता. त्यावेळेस लोकांची चेंगरा चेंगरी होऊ नये तसेच रहदारी नियंत्रीत करण्यासाठी आयोध्येतील रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना अनेक सैनिक नेमले होते. हे पोलीस व्यवस्थेचेच कार्य त्या सैनिकांनी त्यावेळी केले होते.[४] महाभारतात देखील लोकांच्या हालचालींवर नजर ठेवण्याकरिता म्हणून राजा काही अधिकायांची नेमणूक करीत असे. त्यांना 'चार पुरुष' अथवा गुप्तहेर म्हणत. गुप्तहेर खाते हे राज्याचे प्रमुख अंग होऊन बसले. काहींच्या मते कौटिल्याला अभिप्रेत असलेले राज्या व परिपालनपध्दती ही आर्षकालतदेखील प्रचलित होती. [५]

प्राचीन काळात ज्या मनुने आजच्या सारखे कायदे तयार केले होते त्यानेही पोलीस व्यवस्थेची माहिती दिलेली आढळते. त्याने सांगितले आहे की राजाने आपल्या राज्यात पोलीसांची गस्त ठेवली पाहिजे. पोलीस चौक्या-स्थानके उभारली पाहीजेत. मनुने गुप्तहेरांचा उपयोग राज्यातील गुन्ह्यांना प्रतिबंध घालण्यासाठी तसेच गुन्हेगारांना जेरबंद करण्यासाठी कसा करावयाचा याचा उल्लेख केलेला आहे. प्राचीन भारतातील राजे गुप्तहेरांचे चांगले संघटन ठेवत असत त्यांच्याकडून राजाला आपल्या राज्यात काय चालले आहे, अंतर्गत कट व कारस्थान या

ब-लची माहिती तसेच राज्यातील गुन्हेगारांना पकडण्याकरीता व गुन्ह्यांवर प्रतिबंध घालण्याकरिता म्हणजे गुन्हेगारी रोखण्याकरीता उपयुक्त ठरेल .[६] याचबरोवर परराज्यातील माहिती व परकिय अक्रमणाबलची माहिती राजास गुप्तहेरांकरवी

मिळत असे. मनुने गुन्ह्यांच्या संकल्पनांची रचना केली तसेच विकसीत केली. सार्वजनिक सामाजीक जीवन पद्धतीकरीता हिंदू कायद्याचे स्पष्टीकरण आपणास मनुस्मृती मध्ये आढळते. मनुने यात गुन्ह्यांचे विविध प्रकार सांगितलेले आहेत व त्यांची अठरा विभागात विभागणी केलेली आहे. त्यात हल्लेखोर, हल्ला करणारा, बदनामी, चोरी, दरोडे, जुगार, सट्टा ,व्याभिचार, दांडगाई, हिंसा इत्यादी सारख्या गुन्ह्यांबल माहिती मिळते. मनुस्मृती मध्ये दिलेले कायदे म्हणजे इग्रजांनी तयार केलेल्या भारतीय दंड संहिते प्रमाणेच त्याकाळातील समाजव्यवस्थेकरीता केलेले कायदे होते. प्राचीन काळात सहसा घडणारे गुन्हे म्हणजे पाळीव प्राण्यांची चोरी, व्याभिचार, दुखापत करणे, खुन इ. [७] चोरीचा तपास करुन चोरांना पकडण्याकरीता आजच्यासारखाच कुत्र्यांचा वापर त्याकाळात देखील केला जात असे. मनुस्मृतीमध्ये आपणास गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी, गुन्ह्यांना प्रतिबंध घालण्याकरीता तसेच गोपनीय माहिती गोळा करण्याकरीता गुप्तहेर संघटन कार्यरत असल्याची माहिती मिळते. राजाने गुप्तहेर तसेच सैनिकांचा उपयोग करुन गुन्हेगारास कसे जेरबंद करावे याकरीता सुचना देखील दिलेल्या आहेत.

आधुनिक काळातील पोलीसांप्रमाणे गुन्ह्यांचा तपास करणारा तपासी अधिकारी तसेच खबयांचा देखील उल्लेख आपणास कात्यायन स्मृती मध्ये आढळतो.[८] पोलीस ठाण्यांचा उल्लेख मनुस्मृती मध्ये आढळतो . त्याकाळात पोलीस ठाण्यास 'स्थानक' म्हणत असत. दोन,तिन किंवा पाच गांवाच्या समुहाला पोलीस ठाणे म्हणजेच स्थानक किंवा गस्तीकरीता टोळ्या असाव्यात अशी शिफारस मनुने केलेली आढळते.[९] गुन्ह्याचा तपास करण्याकरीता राजाने नियुक्त केलेल्या अधिकायास 'सुचका' असे संबोधले जात असे.[१०] राजाने गुन्हा कसा उघडकिस आणावा, गुन्ह्याचा तपास आपल्या अधिकायांकडून कसा करुन घ्यावा , राज्यातील गुन्ह्यांवर नियंत्रण कशे ठेवावे , गुन्हेगारास केलेल्या गुन्ह्याबल कोणती शिक्षा करावी इ. सारख्या बाबींचा उल्लेख आपणास मनुस्मृतीमध्ये आढळतो . गुन्हेगारी सोडलेल्या म्हणजेच सुधारलेल्या चोरांच्या मदतीने चोरीच्या गुन्ह्याचा तपास करावा व चोरांना पकडून शिक्षा करावी. गुन्ह्यांच्या तयारीत असलेले गुन्हेगार किंवा गुन्हा करुन आलेले गुन्हेगार हे सहसा खानावळ, जुगाराचे अड्डे ,दारुचे दुकान, तसेच गर्दीच्या ठिकाणी आढळून येतात त्यामूळे राजाने आशा ठिकाणी गुप्तहेरांना तसेच सैनिकांना गस्त घालावयास सांगवे त्यामूळे गुन्ह्यांना प्रतिबंध होईल व गुन्हेगार देखील पकडले जातील.[११]

प्राचीन भारतीय वाङःमयात आपणास समृद्ध इतिहास पहावयास मिळतो. त्यात आपणास वेगवेगळ्या प्रकारची राज्ये ,राजे व त्यांची नितीमूल्ये, जीवनपद्धती व ती जगण्याचे नियम यांची माहीती मिळते. त्याकाळात नियम व कायदे प्रजेला तसेच राजाला देखील बंधनकारक असत. राजाच्या व्यक्तिगत सेनेला 'स्वदंड' असे म्हटले जात होते व राज्याच्या पोलीस व्यवस्थेच्या दलाला 'दंडबल' म्हटले जात होते याची माहीत आपणास प्राचीन भारतीय साहित्यात मिळते. प्राचीन भारतीय प्रशासन व्यवस्थेमध्ये व्यक्तिगत स्वातंत्र्य व राजसत्ता यांचा पुरेपुर समतोल राखण्यात आलेला होता. त्यामूळेच 'दंडबल' या यंत्रणेवर प्रतिनिधी सभेचे नियंत्रण असे. लोकांचे सरंक्षण करणे, परिपालण करणे हे तेव्हाच्या राजाचे प्राथमिक कर्तव्य असले तरी प्राचीन भारतात राजाचे अधिकार कधिही सर्वोच्च नव्हते. जनतेच्या स्वतंत्र्यात हस्तक्षेप करण्यापासून राजाला रोखण्याचा अधिकार प्रतिनिधी सभेला होता. पोलीस व्यवस्थेचा उल्लेख वेदांमध्ये स्थानिक पोलीस आणि न्यायदंडाधिकारी यांचे वर्णन अनुक्रमे 'नर' आणि 'नरपती' केल्याचे दिसून येते.[१२] त्रिपीटीका मध्ये षोडस महाजनपदाचा उल्लेख आहे. भारतातील प्राचीनतम लिपी ही सिंधू संस्कृतीत मोहेंजोदडो व हडप्पा येथे मिळालेली आहे. परंतु तिचे वाचन न झाल्याने, नक्की काय लिहीले आहे व त्याकाळी प्रशासन व्यवस्था , पोलीस व्यवस्था कशी होती हे सांगता येत नाही. परंतु चांगली नागरी व्यवस्था अस्तित्वात होती. नियोजन बद्ध घरे व स्नानगृहे हे उन्नत संस्कृती दर्शविण्याकरीता पुरेशे आहेत. तसेच अनेक वंशाचे लोक रहात होते असे दिसते. डॉ.हसमुख सांकलीया यांच्या 'प्रि हिस्ट्री अँड प्रोटो हिस्ट्री' या विद्वत्तापूर्ण ग्रंथावरुन दिसून येते.[१३] येथे उत्खननात महत्वाची अशी कुतुहल निर्माण करणाया मुद्रा मिळालेल्या आहे. त्यातीलच एका मुद्रेवर 'दंडधारी' मानवाची आकृती कींवा चित्र आपणास पहावायस मिळते. हे चित्र 'दंडनायक' म्हणजेच 'दंडधर' याचे असावे असा या चित्राचा अर्थ लावण्यात आलेला आहे.प्राचीन काळात हा दंडनायक पोलीस व्यवस्थेचा प्रमुख असे. त्यामूळे असे समजले जाते की प्राचीन काळातील पोलीस व्यवस्थेचा पुरावा देणारे हे पहिले चित्र आहे , पुरावा आहे.[१४]

प्राचीन हिंदू काळातील इतिहासात आपणास 'दंडधारी' ह्या शब्दाचा उल्लेख मिळतो. भारतातील पोलीस व्यवस्थेच्या विकासक्रमात त्याकाळातील दंडधारीस वर्तमान काळातील पोलीस व्यवस्थेच्या समकक्ष मानले जाऊ शकते. प्राचीन भारतात पोलीस व्यवस्था होती याचा हा पुरावा मानण्यात येतो. पोलीस व्यवस्थेचा पाया म्हणजेच हा 'दंडधारी' होय. 'दंड' हे राज्याच्या शक्तीचे प्रतिक होते. यामूळे धार्मिक नियम तसेच नितीमूल्यांचे पालन प्रजेकडून करुन घेतले जात असे. रामायण व महाभारतात देखील म्हटले आहे की प्रजेचे सरंक्षण करणे हे राजाचे प्रथम दायित्व आहे. भारतीय विचारवंतानी 'दंड' हि अतिशय महत्वाची विचारधारा अस्तित्वात आणलेली आहे. 'दंड' म्हणजे लाठी किंवा सोटा. 'दंड' हे अधिकारशाहीचे प्रतिक मानन्यात येते. ते समाज

व्यवस्थेला, प्रजेला नियंत्रित करणारे परंपरागत साधनच होते. पुढिल काळात 'दंड' हे गुन्हेगारांना शासन करण्याचे राजाच्या कार्यातील धार्मीक प्रतिकच झाले. 'दंड' हे राजाचे गुन्हेगारांना शिक्षा देण्याच्या अधिकाराचे प्रतिकच झाले( Right to Punish).[१५]

प्राचीन काळात ग्रामिण व शहरी भागाकरिता वेगवेगळी पोलीस व्यवस्था असे. गावातील पोलीस व्यवस्था ही त्याकाळी संपुर्ण गावाची सामुदायिक जबाबदारी असे. आपली ही जबाबदारी ते परस्पर संबधातून पार पाडित असत. पोलीस व्यवस्थेची शांतता व सुरक्षा हे संपूर्ण गांव मिळून पार पाडत असत. [१६] प्राचीन भारतातील स्थानीय शासन मुख्यतः ग्रामीण पंचायतींवर आधारित असे. प्रत्येक खेडे गांवात एक जेष्ठ अनुभवी व्यक्ती ही त्या गावचा मुख्य असे त्याच्या मदतीस चौकीदार किंवा पहारेकरी आणि काही वेळेस खास पोलीस व्यवस्थेचे कार्य करणारा मदतनीस देखील असे.[१७] गावातील न्यायव्यवस्था, पोलीस व्यवस्था , गावाच्या सुरक्षेची जबाबदारी तसेच गावांत कुठलाही गुन्हा घडू नये तसेच चोरी , खुन असा कुठलाही गुन्हा घडल्यास त्याचा तपास लावणे हे कार्य गावप्रमुखाचे म्हणजेच ग्रामणीचे असे. गावात कोणी अनोळखी व्यक्ती अथवा संशयित व्यक्ती आल्यास गावप्रमुखास गावातील चौकीदार वर्दी देत असे. जर गावात एखादी चोरी झाली तर चोर पकडणे व चोरीस गेलेला माल परत मिळवुन तो मूळ मालकास परत करणे ही जबाबदारी ग्रामणीचीच असे. जर तो असे करण्यास असमर्थ ठरला तर तो तसेच गावकरी मिळून ज्याच्याकडे चोरी झालेली आहे त्या व्यक्तीस नुकसान भरपाई देत असत. जर गावात गावकऱ्यांच्या मागणीवरुन काही खास प्रसंगी शासनाकडून पोलीसांची मदत घेतली म्हणजेच काही दिवस गावात पोलीस बोलावले तर त्याबाबत गावकऱ्यांकडून कर घेतला जात असे. [१८] जर गावाने गुन्हेगारास किंवा गुन्हेगारांना मदत केली , सहारा दिला तर गावातील लोकांना दंड केला जात असे व दंडाची वसूली केली जात असे.[१९] वेदांमध्ये जसा पोलीस व्यवस्थेचा उल्लेख मिळतो तशाच प्रकारचा उल्लेख आपणास जैन धर्मीय व बौद्ध धर्म काळातील जातक कथांमध्ये मिळतो.[२०]

**मौर्यकालीन राज्यव्यवस्था :** प्रजेचे रक्षण करणे व न्यायदान करणे ही राजाची प्रमुख कर्तव्ये होती. राज्यकारभाराच्या सोईकरीता साम्राज्याची सहा विभागांत विभागणी केली होती. राज्यकारभाराकरीता राजाला सल्ला देण्याकरीता जे मंडळ होते त्याला मंत्रिपरिषद म्हणत.मंत्री व पुरोहित ही पदे चंद्रगुप्ताच्या काळात आर्य चाणक्याकडे होती. परराष्ट्र धोरण ,देश परदेशातील गुप्तहेरांची नियुक्ती करणे,धार्मीक धोरण व आचार या विषयी सल्ला देण्याचे कार्य त्यांच्याकडे होते. राज्यकारभार चालवण्याकरीता अधिकारी नेमलेले असत. जिल्ह्याच्या अधिकाऱ्याला रज्जुक म्हणत. तालुक्याच्या अधिकाऱ्याला 'गोप' म्हणत, तर खेड्याच्या प्रमुखाला 'ग्रामणी' म्हणत. 'मंत्रिपरीषद' आणि अधिकाऱ्यांच्या मदतीसाठी कार्यक्षम हेरखाते होते.

**मौर्यकालीन पोलीस व्यवस्था :** भारताच्या प्राचीन इतिहासात मौर्यकाल हा एक श्रेष्ठ कालखंड आहे. भारताच्या इतिहासात मौर्यांचा कालखंड महत्वाचा आहे. मौर्य काळात भारतात एकछत्री साम्राज्याची स्थापन होऊन स्थिर शासन मिळाले. मौर्यपुर्वकाळात भारत देश हा लहान लहान राज्यांत विभागला गेला होता. अशा या विस्कळित भारतात एकछत्री अंमल प्रथम चंद्रगुप्तानेच प्रस्थापित केला. चंद्रगुप्त मौर्य हा मौर्य साम्राज्याचा संस्थापक होय. मगधचा राजा धनानंद याच्या जुलमी सत्तेचा पाडाव करुन मगधवर त्याने आपली सत्ता प्रस्थापित केली. प्राचीन इतिहासात आपणास मौर्य काळातील तसेच गुप्त काळातील पोलीस व्यवस्थेबाबत सविस्तर अशी माहीती मिळते. चंद्रगुप्ताच्या दरबारातील ग्रीक राजदुत मेगस्थनीज याचे अहवाल तसेच कौटिल्याचा अर्थशास्त्र ग्रंथ यामधुन आपणास पोलीस व्यवस्थेची माहिती मिळते. मेगस्थनीज हा चंद्रगुप्तच्या दरबारात पाटलीपुत्र येथे ग्रीक राजदुत होता. त्याने इ.स.पूर्व चौथ्या शतकाच्या शेवटी पाटलीपुत्र येथील प्रशासनाबाबत वर्णन केलेले आहे. त्यात त्याने म्हटलेले आहे की तेथे कायदा व सुव्यवस्थेचा स्थर उच्च दर्जाचा होता. कायदे अतिशय कडक होते. हात, पाय कलम करण्याची शिक्षा सामन्य होती. राजाचा वाहनताफा शिकारीला निघाल्यानंतर त्यास कोणी आडवे आले, देशाविरुद्ध कट करणारे - राजद्रोही, वृक्षतोड करणारे यांना फाशीची शिक्षा देखील दिली जात होती. राज्यात सर्वत्र गुप्तहेरांचे जाळे विणलेले होते.त्यामुळे प्रशासनाला राज्यातील खडानखडा माहिती मिळत असे.

**कौटिल्याचे अर्थशास्त्रः** कौटिल्याने इ.स.पुर्व ३१० मध्ये अर्थशास्त्र या ग्रंथाची निर्मीती केली. अर्थशास्त्र फक्त ऐतिहासीक दृष्ट्या मंत्रमूग्ध करणारे पुस्तक नसून २३०० वर्षापूर्वी प्रशासन ,पोलीस व्यवस्था कसे कार्य करीत होती व ती कीती कार्यक्षम होती याचा पुरावाच आहे. आचार्य चाणक्य उर्फ कौटिल्य हे मौर्य सम्राट चंद्रगुप्त मौर्य यांचे गुरु तसेच महामंत्री-आमात्य होते. कौटिल्याचा काळ हा चंद्रगुप्त मौर्याचा काळ आसून इ.स.पूर्व ३२१ मध्ये चंद्रगुप्ताचे राज्यारोहण झाले होते आजच्या बिहार मधील पाटणा म्हणजेच प्राचीन काळातील 'पाटलीपुत्र' हे नगर मौर्य साम्राज्याची राजधानी होती. अर्थ हा शब्द अर्थशास्त्रात प्राधान्याने येतो त्याचा शास्त्रानुसार अर्थ म्हणजे लोकांचे योगक्षेम. अर्थात या पृथ्वीवर रहाणारे लोक हा त्याचा पर्याय असून अर्थशास्त्र हे भूमि अवगत करुन तिचे रक्षण करण्याचे शास्त्र आहे. अर्थात राजाने पृथ्विवर राज्य कसे करावे याचा परामर्श हे शास्त्र घेते. अर्थशास्त्रामध्ये दंडनीती मांडलेली आहे. दंडनीतीत गुन्हेगाराला शिक्षा सुनावलेली असते तर अर्थशास्त्रात राज्यशासनाचे नियम येतात. नीतीशास्त्र याच्या कक्षेतच येते. कौटिल्याने अर्थशास्त्रात राजेशाही हेच शासनाचे स्वरुप दिलेले आहे. अर्थशास्त्रात

राजाने राज्यात प्रशासन कसे करावे याच बरोबर पोलीस व्यवस्था , गुप्तचर संघटन व्यवस्था, मुलकी कायदे, गुन्हेविषयक कायदे, पोलीसांची तपासाची पद्धत, गुन्हे प्रकटीकरण, गुन्हे प्रतिबंधात्मक उपाय, गुन्हेगारास शिक्षा ,इ. ब-ल सखोल माहीती दिलेली आहे.[२१] गुप्तहेरांची निवड कशी करावी याबाबत देखील सखोल माहीती अर्थशास्त्रात दिलेली आहे. म्हणूनच कौटिल्यास पोलीस व्यवस्थेच्या संकल्पनेचा पिता मानले जाते. [२२] अर्थशास्त्रात गुप्तहेर निवडी बाबत मार्गदर्शन केलेले आहे. गुप्तहेर हा चांगल्या कुटूंबातुन असावा. तो हूशार व प्रामाणिक असावा तसेच कार्यक्षम व प्रशिक्षीत असावा. राजाने आपल्या पोलीस व्यवस्थेमधील गुप्तहेरांकडून प्रजेबल ,शासकीय अधिकायांब-ल ,राजकुमारांबाबत खडानखडा माहिती कशी घ्यावी या ब-ल देखील मार्गदर्शन केलेले आहे. राज्यातील अधिकायांनी आपल्या पदाचा गैरवापर करु नये ,त्यांनी भ्रष्टाचार करु नये याकरिता देखील त्यांचेवर नजर ठेवण्याकरीता गुप्तहेर नेमावेत तसेच वेळोवेळी राज्यातील आधिकायांची गुप्तहेरांकरवी परिक्षा घ्यावी म्हणजे त्यांना गुप्तहेरांकरवी प्रलोभने द्यावीत जर त्यास हे आधिकारी बळी पडले तर त्यांना पदच्युत करुन शिक्षा करावी. कर्तव्य करित असतांना जे गुप्तहेर मारले जातील त्यांच्या कुटूंबियांना शासनाने मदत द्यावी तसेच त्यांना भरपाई द्यावी असे सांगीतलेले आहे.

**कौटिल्याची दंडनिती:** मौर्य काळात कौटिल्याने धार्मीक कायद्याची मान्यता असलेली प्रभावी अशी पोलीस व्यवस्था निर्माण केली होती. तसेच पोलीस व्यवस्थेमध्ये कार्य करणाया अधिकायांचे वेगवेगळी पदे निर्माण केली होती. त्याची ही पोलीस व्यवस्था प-द्धती संपूर्ण भारतात राबविण्यात आल्याचे आपणास इतिहासात पहायला मिळते. बराच काळ ही पोलीस व्यवस्थेची परंपरा चालूच होती अपवाद फक्त कुषानांच्या काळात यात काही पदे वाढविण्यात आली. कौटिल्याने अर्थशास्त्रात मांडलेल्या दंडनिती मध्ये गुन्ह्यांचे प्रकार, त्यांना हातळण्याची पद्धती, गुन्हेगाराकडून गुन्हा कबूल करुन घेण्यासाठी करावयाचे उपाय - छळ, गुन्हेगारास गुन्ह्याच्या प्रमाणात द्यावयाची शिक्षा, इ.बाबत मार्गदर्शन केलेले आहे. त्यामूळेच दंडनिती हे प्रशासनाचे प्रमुख अंग झालेले होते. प्रजेचे रक्षण करणे चांगल्या वागणूकीच्या , धर्माचरणाचे पालण करणाया प्रामाणिक लोकांचे हिनप्रवृत्तीच्या , दंडेलशाही वृत्तीच्या लोकांकडून संरक्षण करणे, राज्यात शांतता व सुव्यवस्था ठेवणे अशी प्रमुख कामे पोलीस व्यवस्थेची होती. मुख्य दळणवळणाच्या रस्त्यांवर , मार्गांवर ,दाट राणझाडी असलेल्या रस्त्यांवर प्रवाशांचे, यात्रेकरुंचे दरोडेखोरांपासून ,लूटारुंपासून सरक्षण करणे. चोर-दरोडेखोर यांना जेरबंद करणे. याकरीता मौर्यकालीन पोलीस व्यवस्था फारच कार्यक्षम होती.[२३] मौर्य कालीन पोलीस व्यवस्था ही केंद्र नियंत्रित पोलीस व्यवस्था होती. पोलीस व्यवस्थेचा शिरकाव जनतेच्या राजकीय, अर्थिक , सामाजिक आणि धार्मीक बाबींमध्ये देखील होत असल्याने कायदा व सुव्यवस्था परिस्थिती चांगली होती. अत्यंत प्रभावी अशी गुप्तहेर संघटना व लाचलुचपत प्रतिबंधक खाते त्याकाळात कार्यरत होते. कौटिल्याने पोलीस व्यवस्थेकडून कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी तसेच गुन्हेगारांवर नियंत्रण ठेवण्याकरीता प्रभावी गुप्तहेर खाते निर्माण केलेले होते. यामध्ये विविध प्रकारचे गुप्तहेर असत सिमा भागातील सुरक्षा , तस्करीचा प्रतिबंध ,कायदा व सुरक्षा दल, बाहेरील राज्यातून आलेल्या नागरिकांना परवाना देणे तसेच बाहेरील राज्यात जाणाया लोकांना पारपत्र व्यवस्था,जकात तसेच महसूल चोरीवर आळा घालणारे दल , लाचलूचपत प्रतिबंधक विभाग अशी परिपूर्ण व्यवस्था त्याकाळी करण्यात आलेली होती. [२४]

**मौर्यकाळात पोलीस व्यवस्थेचे पुढिल प्रमाणे दोन प्रकार होते** [२५]

१. नियमित कार्य करणारी पोलीस व्यवस्था
२. गोपनीय कार्य करणारी पोलीस व्यवस्था

**नियमित कार्य करणारी पोलीस व्यवस्था :** या पोलीस व्यवस्थेकडे नेहमीचे शांतता व सुव्यवस्थेचे कार्य होते. या पोलीस व्यवस्थेची ग्रामिण व शहरी अशा दोन भागात विभागणी केलेले होती. ग्रामिण भागाकरीता 'प्रदेस्था' व शहरी भागाकरीता 'नागरिक' (कोतवाल) हे वरिष्ठ आधिकारी असत. त्यांचे खालोखाल ग्रामिण व शहरी पोलीस व्यवस्थेचे कार्य करणारे 'स्थानिक' हे असत. त्यांच्या खाली गोप असत. प्रत्येक गावात 'ग्रामिक ' हा गावातील न्याय व सुरक्षा प्रशासनाचे कार्य पहात असे.' प्रदेस्था' आणि त्याच्या हाताखालील 'गोप' व 'स्थानिक' यांच्यांवर ग्रामीण भागातील चोरीचा शोध घेऊन चोरांना, गुन्हेगारांना पकडण्याची जबाबदारी असे. शहर पोलीस व्यवस्थेचा प्रमुख 'नागरिक' व त्याच्या हाताखालील 'गोप' व 'स्थानिक' यांच्यावर शहरीभागातील चोरीचा शोध घेऊन चोरांना, गुन्हेगारांना पकडण्याची जबाबदारी असे.गावातील पोलीस व्यवस्थेचे काम ग्रामिकाकडे असे. ग्रामिकास गावातील वयोवृद्ध लोक मदत तसेच मार्गदर्शन करित असत. ग्रमिकास लोकांनी निवडलेले असे व त्यास शासनाकडून वेतन मिळत नसे. पाच-दहा गावांच्या ग्रामिकांवरती गावांची व्यवस्था पहाण्यासाठी 'गोप' असत. हे सर्व मिळून गावात शांतता व सुव्यवस्था ठेवत असत. हे सर्व मिळून चोरी,दरोडे व इतर गुन्ह्यांना आळा घालण्यास जबाबदार असत. [२६] कौटिल्याने प्रशासनातील १८ अधिकायांची माहीती अर्थशास्त्रात दिलेली आहे. पैकी सहा अधिकारी हे पोलीस व्यवस्थेचे व सैन्य दलाचे कार्य करीत असत. दौवरिक, अंतरवानसीक, प्रदेशास्था , दंडपाल, दुर्गपाल, अंतपाल आणि अटविका असे हे सहा अधिकारी असत. 'दौवरिक' हा पोलीस व्यवस्थेचे कार्य करणारा पोलीस अधिकारी असे. राजवाड्याच्या सुरक्षेस तो जबाबदार असे.

'अंतरवानशिका' हा जनानखान्याचा पर्यवेक्षक असे. हा अधिकारी स्त्री प्रमाणे असे हिचे कर्तव्य राजाबरोबर घनीष्ठ संबंध असणाया स्त्रियांवर लक्ष ठेवणे व कट-कारस्थान, घातपातापासून राजाची सुरक्षा करणे. राजवाड्या बाहेरील शांतता व सुव्यवस्था ठेवण्याचे महत्वाचे कार्य 'दौवारिका' चे असे व 'अंतरवांशिका' राजवाड्याच्या आतली शांतता व सुरक्षा ठेवण्याचे महत्वाचे कार्य करीत असे.[२७] नंतरच्या काळात 'दंडपाल' हा 'दंडपाशिक' किंवा 'पुरापाल' म्हणून ओळखला जाऊ लागले. तो अधिकाधिक पोलीस व्यवस्थेचे कार्य करु लागला.[२८] दुर्गपाल हा नंतरच्या काळात कोटपाल, काटूअला किंवा कोतवाल म्हणून ओळखला जाऊ लागला. सुरुवातीला त्याच्याकडे किल्ला-दुर्ग यांची सुरक्षा ठेवण्याचे उत्तरदायित्व असे. कोतवाल हा नगराच्या व्यवस्थेचा प्रमुख असे. त्याच्याकडे नगरातील पोलीस व्यवस्था म्हणजेच शांतता व सुरक्षा व्यवस्था, महसुल गोळा करणे, शहरात गुप्तहेर तसेच पहारेकरी ठेवणे, महत्वाच्या ठिकाणी सुरक्षा रक्षक नेमणे. रात्रीची गस्त करण्याकरीता सुरक्षा कर्मचारी नेमणे. कोतवाल आपले कार्य करीत असे त्याबरोबरच आपल्या भागात आलेल्या गेलेल्या अनोळखी व्यक्तींची माहीती देणे ही घरमालकांची जबाबदारी होती.महत्वाच्या ठिकाणी नेमलेले पहारेकरी हे प्राणघातक शस्त्रे बाळगणायांना ताब्यात घेत असत तसेच संशयीत व्यक्तींना ताब्यात घेऊन त्यांची विचारपुस केली जात असे. पहारेकयांनी जर आपले कर्तव्यात दुर्लक्ष केले तर त्यांच्यावर देखील कार्यवाही केली जात होती.रस्त्यावर घाण ,कचरा टाकणाया व्यक्तींना दंड केला जात असे. अशा प्रकारचे सर्वसाधारण पोलीस व्यवस्थेची कर्तव्य तसेच कारागृहाचे प्रशासन, दररोज शहराची सुरक्षा व्यवस्था तपासणे व बेवारस, चोरीचा मिळालेला मु-`माल ताब्यत ठेवणे ही कोतावालची जबाबदारी होती. सूर्य मावळल्यानंतर अडीच तासांनी कोतवाल नगरात संचारबंदी लावत असे व पहाटे शिथील करीत असे. त्यामूळे संचारबंदीच्या काळात सराईत चोरांना ,दरोडेखोरांना जेरबंद करता येणे शक्य होत असे. 'अनंतपाल' हा रस्ते ,महामार्ग सुरक्षा ठेवण्याचे कार्य करीत असे. प्रवासी व यात्रेकरु यांची सुरक्षा ठेवण्याचे कार्य याचेच असे. तसेच व्यापारी, प्रवासी यांची चोर ,लूटारुंपासुन सुरक्षा करणे तसेच पथकर वसूल करणे हेदेखील याचेच कार्य होते. जर महामार्ग, पथ प्रवासात एखाद्या व्यक्तीची वा व्यापायाची चोरी झाली तर चोरीस गेलेला माल मिळवून देण्याचा अथवा भरपाई देण्याची जबाबदारी याचीच असे.[२९] अटाविका हे रात्रीची गस्त घालण्याचे कार्य करीत असत. अटविपाल हा गस्तीवरील अटविकांचा प्रमुख अधिकारी असे.[३०]

कौटिल्याने गुन्हे विषयक कायदे व नियम देखिल सांगीतले आहेत. त्यानुसार कंटकशोधन होत असे. कायद्याचा वापर करुन समाजातील कंटकांवर कार्यवाही केली जात असे. त्याकाळातील कंटक खालील प्रमाणे असत. [३१]

१. व्यापारी व कलाकार जे आपल्या ग्राहकांची फसवणूक करतील.
२. रुग्णाकडे दुर्लक्ष करणारा वैद्य.
३. अप्रामाणिक संगितकार व नर्तक.
४. पांढरपेशा वेशातील चोर.
५. नगरात बळजबरीने प्रवेश करणारे,फसवणूक करणारे लोक.

राज्यातील दारु विक्री करणारे, खानावळ चालक, वैद्य ,धर्मशाळा चालक यांनी नियमीत पणे संशयीत व्यक्तींची माहीती देणे त्यांना कायद्याने बंधनकारकच केलेले होते. रात्रीच्या वेळी चोया,दरोडे,इ.सारखे गुन्हे जास्त होतात म्हणून रात्री संचारबंदी लावण्यात येत असे. संचारबंदी काळात फक्त वैद्य, अंत्ययात्रा, शासकीय कर्तव्यावर असणारे कर्मचारी , अग्निशामक दल यांनाच परवाणगी असे. इतरांना संचार करण्यास बंदी काळात घरा बाहेर पडण्यास हिंडण्यास मनाई असे. [३२]

**प्रजेचा पोलीस व्यवस्थेमध्ये सहभाग :** जगातील कुठलीही पोलीस व्यवस्था लोकांच्या सहभागाशिवाय व सहकार्याविना परिपूर्ण कार्य करुच शकत नाही हे जगमान्य आहे. आज देखील पोलीस दलाला नागरीकांचे सहकार्य पाहीजे तेवढे मिळत नाही. तसेच नागरीकांनी आपल्या वास्तव्याच्या ठिकाणी तसेच इतर ठीकाणी सुद्धा सजकतेने लक्ष ठेवणे आवश्यक आहे, संशयित व्यक्ती आढळल्यास पोलीसांना माहीती देणे. आपल्या आजूबाजूला काही गुन्हा घडत असेल किंवा घडणार असेल तर याची माहीती पोलीसांना देणे. परंतु असे कराणारांचे प्रमाण हे अत्यल्प आहे. त्यामूळे गुन्ह्यांचे प्रमाण वाढत आहे व गुन्हेगारांचा शोध लागण्याचे प्रमाण काहीसे कमी आहे. मात्र मौर्य काळात राज्यात गुन्हे घडू नये म्हणून फक्त पोलीस व्यवस्थेचीच जबाबदारी नव्हती तर राज्यातील शहरी तसेच ग्रामीण भागातील प्रजेचा देखील राज्यात गुन्हयांना प्रतिबंध बसावा याकरीता मोठ्या प्रमाणात सहभाग असे. ज्या भागात, गावात गुन्हा घडत असे त्या ठिकाणची प्रजा देखील त्यास उत्तरदायी असे. आपल्या भागात फिरणाया संशयीत व्यक्ती तसेच समाजविघातक कृत्य करणाया व्यक्ती यांच्या बल माहीती देण्याची जबाबदारी प्रजेची असे.गुन्ह्यांना पायबंद बसण्याकरीता ग्रामीण भागातील स्त्रियांना गुप्तहेर नेमूण त्यांच्याकरवी गोपनीय माहीती गोळा केली जात असे. गावातील दुकानात येणारे ग्राहक, दारुच्या गुथ्यावर जमलेले लोक, गावात मुक्कामी असलेले बाहेरील लोक, अनैतीक मार्गाने मालमत्ता जमविणारे लोक, चोरीचा पैसा देऊन मालमत्ता खरेदी करणारे लोक यांच्या सारख्या लोकांवर पाळत ठेऊन त्यांना पोलीसांच्या स्वाधीन केले जात असे.[33] शहरी भागातील लोकांना देखील अचारसंहिता होती. शहरात येणाया नविन अनोळखी व्यक्तींवर लक्ष ठेवणे.

नगरातील धर्मशाळा चालकांनी त्याच्याकडे मुक्कामी असणाया व्यक्ती पैकी कुणी संशयी वाटल्यास माहीती देणे. वैद्याकडे कोणी संशयीत व्यक्ती उपचारास आला तरी त्यांनी माहीती पोलीसांना देणे बंधनकारक होते. तसेच धोकादायक अमलीपदार्थ विक्री करणारांची देखील माहीती द्यावी. तसे न केल्यास व उघडकीस आल्यानंतर संबधितांवर दंडात्मक कार्यवाही केली जात असे.[३४] गुन्हेगार, संशयीत गुन्हेगार जर गुन्हा कबुल करीत नसेल तर त्याचा छळ(torture) करुन त्यास त्याने केलेला गुन्हा कबुल करण्यास भाग पाडले जात असे. कौटिल्याने छळ(torture) करण्याच्या चौदा पद्धती दिलेल्या आहेत. यातील काही प्रकार सर्वसाधारण गुन्हेगारांकरीता तर काही पद्धती क्रुर ,भंयकर गुन्हेगारांकरीता राखीव असत. असे असले तरी गर्भवती महिला, ब्राम्हण, संत यांना यातून वगळले जात असे.[३५]

त्यावेळची पोलीस व्यवस्था ही नित्य सतर्कता (Continual vigilance) या तत्वावर अधारीत होती. अर्थशास्त्र आपणास संशयीत व्यक्ती , गुन्हेगार कसे ओळखायचे याचे मार्गदर्शन करते. कौटिल्याचे मार्गदर्शन आजच्या पोलीस व्यवस्थेला देखील अत्यंत उपयुक्त असे आहे. ज्यांचे कुटंब वारसा हक्कांच्या निरुपयोगी माध्यमांवर अवलंबून आहे अशी व्यक्ती, ज्यांच्या जीवनात सोईसुविधा नाहित अशा व्यक्ती. ज्या व्यक्त नेहमी आपले व संपुर्ण कुटुंबाचे नाव, जात, घर बदलतात. जे लोक नियमीत दारु पीतात, सुगंधी वस्त्र व महाग कपडे घालतात, दागदागीने वापरतात,पैसे जास्त प्रमाणात खर्च करतात, जुगार खेळतात, जे दुरच्या एकांत परिसरात गुप्त बैठका घेतात, नेहमी घराबाहेर असतात, जे आपल्याला नुकत्याच झालेल्या जखमा त्वरीत बया होण्याकरीता घाई करतात. जे नेहमी अप्रामाणिक अशा महिलांसोबत फ़ीरतांना दिसतात अशा प्रकारच्या व्यक्तींवर लक्ष ठेवले पाहीजे त्या व्यक्ती गुन्हेगार, खुनी किंवा चोर दरोडेखोर असु शकतात. [३६]

**2) <u>गुप्तहेर पोलीस व्यवस्था</u> :** कौटिल्याचे अर्थशास्त्र व मेगस्थनीज चे 'इण्डिका' यातून आपणास मौर्यकालीन समाज व्यवस्था व गुप्तहेर पोलीस व्यवस्था कशी होती याची माहीत मिळते. चंद्रगुप्ताच्या कार्यकाळात गुप्तहेरांचे संघटन अतिशय मजबूत होते.साम्राज्यातील इत्यंभूत माहिती मिळवण्यासाठी हेरांचा मोठा उपयोग होत असे.ह्यामध्ये स्त्रियाही असत.हेरांना प्रथम त्यांच्या कामाचे शिक्षण देण्यात येई. प्रशिक्षित हेर सर्व राज्यात पसरले होते. त्यांना वेतन दिले जात होते. राजाला राज्यातील महत्वाची माहीती , शत्रुराज्यातील माहीती, गुन्हेगारांबददल माहिती तसेच शासकीय अधिकारी यांच्या ब-लची माहीती दिली जात असे. विद्यार्थी, व्यापरी,संन्यासी ,भिक्षू इ. निरनिराळ्या वेशात गुप्तहेर माहिती काढत. शत्रुच्या आर्थिक व लष्करी हालचालीची माहिती हेर रजाला देत. तसेच संन्यातील असंतोष , राज्यातील हालहवाल इत्यादींचे ज्ञान या विभागाकडून होत असे. गुप्तहेरांची परीक्षा घेऊन प्रामाणिक कार्यक्षम व्यक्तीलाच गुप्तहेर म्हणून नियुक्त दिली जात असे.[३७] मौर्य साम्राज्यात गुप्तहेर संघटनेत स्थायी गुप्तहेर व फिरते गुप्तहेर हे दोन विभाग होते. स्थायी गुप्तहेर हे एकाच ठिकाणी राहून कार्य करित असत. तर फिरते गुप्तहेर हे राज्यात फिरुन वेगवेगळी उपयुक्त माहीती गोळा करीत असत. समाहर्ता हा केंद्रशासनाचा वरिष्ठ आधिकारी मानला जात असे. राज्यातील कायदा व सुव्यवस्था राखणे, गुन्ह्यांचे प्रकटीकरण,गुन्हेगारांच्या शिक्षेची अमलबजावणी हे त्याचे कार्य असे. त्याच्या मदतीला गुप्तहेर संघटन असे. राज्यातील गुन्हेविषयक तसेच समाजविघातक प्रवृत्तीबाबत माहीती तसेच राज्यातील अप्रामाणिक अधिकायांची माहीती देखील ते समाहर्तास देत असत.[३८] पोलीस व्यवसस्थेतील अधिकायांना राज्यातील महत्वाच्या कामाकरीता राज्यातील इतर ठिकाणी प्रतिनियुक्तीवर जावे लागत असे. पोलीस व्यवस्थेतील अधिकायांवर देखील गुप्तहेरांकरवी लक्ष ठवले जात असे जेणेकरुण ते जनतेवर अन्याय करणार नाहीत , आपल्या पदाचा गैरवापर करणार नाहीत तसेच ते आपले कर्तव्य ठरवून दिल्या प्रमाणे पार पाडतील. गुप्तहेरांना प्रशासनाचे अतिरिक्त डोळेच मानले जात असे. अर्थशास्त्राप्रमाणे त्याकाळी नऊ प्रकारच्या गुप्तहेरांबल आपणास माहीती मिळते. त्यातले महत्वाचे गुप्तहेर म्हणजे मनुष्याच्या मनात काय चालले आहे ते ओोळखणारे, हे गुप्तहेर व्यक्ती गुन्हा करण्याच्या विचारात किंवा तयारीत असतांनाच त्यास जेरबंद करीत असे. साधू वेशातील गुप्तहेर हे वेषांतर करुन आलेले गुन्हेगार तसेच कपट करण्याच्या तयारीत असलेल्या गुन्हेगारांना ओळखुन ताब्यात घेत असत. गरिब शेतकयांच्या वेषातील गुप्तहेर हा ग्रामिण भागातील प्रजेवर लक्ष ठेवत असे. व्यापारी वेषातील गुप्तहेर हा व्यापारी तसेच उद्योजकांवर लक्ष ठेवत असे. गुप्तहेरांना दुसया राज्यातून देखील बातमी काढण्याकरीता पाठविले जात असे. तसेच राज्यातील मंत्री, शासकीय विभागाचे प्रमुख अधिकारी, कधी-कधी तर राजकुमारांवरती देखील पाळत ठेवली जात असे. स्त्रियांची तसेच साध्वींची देखील हेर म्हणून नेमणूक केली जात असे. गुप्तहेराने दिलेल्या महत्वाच्या बातमीची पुन्हा दुसया गुप्तहेरांकरवी खात्री करुन घेतली जात असे. चुकीची खबर देणाया हेरास भयानक शिक्षा दिली जात असे. राज्यातील भ्रष्ट अधिकायांना लाच घेतांना रंगेहात पकडण्याचे कार्य देखील हे गुप्तहेर करीत असत. हे गुप्तहेर राज्यातील पोलीस व्यवस्थेचे अधिकारी, न्यायाधिश, मंत्री तसेच इतर महत्वाचे अधिकारी यांना लाच देण्याचा प्रयत्न करित म्हणजेच त्यांची परिक्षा घेत असत, जर त्यांनी लाच स्विकारली तर त्यांना रंगेहात जेरबंद करीत असत. अशा पद्धतीने भ्रष्टाचाराला आळा घातला जात असे. [३९] चोरीचा माल विकत घेणाया लोकांवर देखील पाळत ठेवली जात असे. राज्यात पूर्व परवानगी शिवाय कुणालाही जूनी वस्तू किंवा माल विकण्याचा किंवा घेण्याचा अधिकार नव्हता.

परदेशातून आलेल्या लोकांवर करडी नजर ठेवली जात असे.पारपत्राशिवाय परदेशी नागरीकास नगरात प्रवेश दिला जात नसे. नगरात आलेल्या अनोळखी लोकांच्या आगमणावर व प्रयाणावर गुप्तहेर बारीक लक्ष ठेवत असत. धर्मशाळेत मुक्कामी रहाणारे यात्री, तसेच मंदिरात-मठात मुक्कामी रहाणारे पाखंडी यांच्यावर देखील पाळत ठेवली जात असे.शक्यतो राज्यात कुठलाही अनुचित प्रकार किंवा गुन्हा घडण्याअगोदरच गुन्हेगारास पकडले जात असे.[४०]

पाटलीपुत्र या नगराची व्यवस्था पहाण्याकरीता तीस सदस्यांची एक परिषद होती. परिषदेच्या हातात नगराचा कार्यभार होता. आजच्या नगरपालिका व महापालिके पेक्षा देखील जास्त अधिकार या परिषदेस होते. परिषदेकडे नगराच्या सुरक्षेचे दायित्व होते व त्याकरीता पोलीस व्यवस्था देखील होती. [४१] मौर्य साम्राज्यात राजा हाच सर्वोच्च अधिकारी असे.सर्व अधिकार राजाच्या हातात असत. मंत्रिपरिषदे द्वारा राजा प्रशासनाचे नियंत्रण करीत असे. नगर प्रशासन , सैनिक व्यवस्था, पोलीस व्यवस्था तसेच स्थानिय प्रशासन चांगले होते. प्रांताचे प्रमुख सहसा राजकुमार असत. प्राचीन काळात मंत्र्यांना तिर्थ म्हणून संबोधले जात असे. राज्यात असे अठरा तिर्थ होते. चाणक्याच्या अर्थशास्त्रात अठरा तिर्थांचा उल्लेख मिळतो. प्रशास्ता हा तुरुंग अधिकारी असे. 'प्रदोष्टा' हा गृहमंत्री असे याच्या अधिन प्रदेशाचे शासन व पोलीस व्यवस्था असे. केंद्रस्थानी पोलीस व्यवस्था ही महादंडनायकाच्या आधिन असे.[४२] साम्राजाची विभागणी प्रांतात व प्रातांची विभागणी जिल्ह्यांमध्ये म्हणजेच 'स्थानिय' मध्ये करण्यात आली होती. 'स्थानिक' हा जिल्हा प्रशासनाचा प्रमुख असे. 'स्थानिका' वरती 'समाहर्ता' चे नियंत्रण असे. 'स्थानिय' मध्ये ८०० गावांचा समावेश असे. स्थानियच्या खालोखाल 'द्रोणमुख' असे द्रोणमुख मध्ये ४०० ग्राम किंवा गावांचा समावेश असे. 'द्रोणमुख' च्या खाली 'खर्वाटिक'असे. त्यात २०० गावांचा समावेश असे. त्यानंतर 'संग्रहण' मध्ये १०० गावांचा समावेश असे. 'संग्रहण' च्या खाली 'गोप' असत. गोपांकडे १० ग्राम-गावांचे नियंत्रण असे. प्रांतात सर्वात छोटी प्रशासन संस्था म्हणजे 'ग्राम - खेडेगांव' असे. 'ग्रमिक' हा गावचा प्रमुख असे. 'ग्रामिक' गावातील जेष्ठ व अनुभवी लोकांच्या मदतीने गावाचे प्रशासन चालवित असे.[४३] महसूल गोळा करणे व अपराधांची रोखथांब करणे ही ग्रामीकाची कामे असत. त्याकाळात शेती व पशुपालन हा प्रजेचा प्रमुख व्यवसाय होता.

**<u>सम्राट अशोकाच्या काळातील पोलीस व्यवस्था:</u>** सम्राट अशोकाच्या काळात पोलीसांचे नविन रुप विकसीत झालेले होते. सर्वसाधारण प्रजेच्या व्यवहारांना नियंत्रित करण्याबरोबरच म्हणजेच प्रजेवर नियंत्रण ठेवण्याबरोबरच लोकांमध्ये आध्यात्मिक भाव, विचार निर्माण करण्याचे कार्य देखील पोलीस करीत असत.[४४] वरिष्ठ पोलीस अधिकायास 'महाआमात्य' म्हटले जात असे. त्याच्यावर राज्यातील शांतता तथा सुरक्षिततेची जबाबदारी असे. त्याच्या अधिपत्याखाली असलेल्यांना 'रज्जुक' म्हटले जात असे. जे प्रशासनिक आणि न्यायिक व्यवस्थेचे प्रमुख असत.[४५] सम्राट अशोकाने पोलीस व्यवस्थेकडे विशेष लक्ष दिल्याचे आढळते. माझ्या प्रजेने माझ्या मुलांप्रमाणेच सुख व आराम मिळवण्याची आशा करावी ,इच्छा ठेवावी असे अशोकाचे मत होते. आपल्या प्रजेच्या सुखाकरीताच त्याने प्रांत ,नगरात व गावांना जास्तीचे अधिकार दिलेले होते. त्यामूळेच पोलीस व्यवस्था अधिक सक्षम होती. सम्राट अशोकाच्या काळात प्रजेकडुन धर्मकार्य करुन घेणे तसेच प्रजे मध्ये धार्मीक भाव निर्माण करणे ,वाढविणे म्हणजेच राज्यात पाप व गुन्हेगारीला आळा घालणे हे पुलिस चे कार्य होते. [४६] त्याने आपल्या २६ व्या राज्यारोहण वर्षी आज्ञा प्रसारीत केली होती की, 'माझ्या रज्जुकांनो (राज्य कर्मचारी) तुमचे फार मोठ्या राज्यावर व प्रजेवर राज्या आहे ,शासन आहे. माझ्या ज्या रज्जुकांवर अभिहार(युद्ध) किंवा दंड(गृह विभाग) ची जबाबदारी आहे ते स्वतः त्या विभागाचे सरंक्षक आहेत. ते पुर्णाधिकारी शासक आहेत. त्यामूळे त्यांनी कुठलेही भय न बाळगता स्थिर चित्ताने आपले कार्य करावे. राष्ट्र तसेच प्रजेच्या कल्याणाकरीता त्यांच्या सुखाकरीता ,हिताकरीता कार्य करावे. जर रज्जुक आमच्या अज्ञेचे उल्लंघन करीत असतील तर खालच्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या आधिन असलेल्या विभागांचे अध्यक्ष पुरुष(पोलीस) यांचे कर्तव्य असेल की आमच्या आदेशाचे पालन करुन घेतील. ह्या आदेशानुसार पोलीस व्यवस्थेला अधिकार दिले होते की जर त्यांचा प्रधान अधिकारी राज आज्ञेचे पालन करीत नसेल तर आपल्या राजाचे आदेश मानावेत'.[४७] एका शिलालेखात अशोकाचे पोलीस व्यवस्थेला आदेश आहेत की, तुरुंगात असलेल्या गुन्हेगारांना देहदंडाची शिक्षा झालेली असेल अशांना तिन दिवस अगोदर त्यांनी सुचित करावे. त्यामूळे अशा गुन्हेगारांना आपल्या परमेश्वराची प्रार्थना करता येईल व केलेल्या गुन्हयाची परमेश्वराकडे क्षमा मागता येईल. यावरुन स्पष्ट होते की त्याकाळी तुरुंग देखील होते.[४८] दंड विभाग , गृह विभागाच्या अंतर्गत न्याय तसेच पोलीस व्यवस्था देखील पाहिली जात होती. केंद्रिय न्यायालय दोन भागात विभाजीत होते. 'धर्मस्थीय' न्यायालयात दिवानी प्रकरणांची सुनावणी होत असे. तसेच 'कंटकशोधन' न्यायालयात फौजदारी प्रकरणांची सुनावणी होत असे. मौर्य साम्राजातील न्यायालयात गुन्हेगारांना अर्थिक स्वरुपातील दंड , हात-पाय कलम करणे , मृत्युदंड अशा शिक्षा दिल्या जात असत.[४९] अर्थव्यवस्था कृषी, पशुपालान व व्यापारावर आधारीत होती. न्यायिक प्रशासनाचा सर्वोच्च न्यायाधिकारी तसेच न्यायाधिश अशोक स्वतः होता. 'रज्जुक' देखील न्यायासंबधीत काम करीत असत.

व्यवहार समता अणि दंड समता अशोकाच्या काळात न्याय प्रशासनात प्रचलीत होते. न्याय व्यवस्थेमध्ये 'धर्ममहापात्र' , 'नगर व्यावहारीक', 'महापात्र' हे देखील दौयावर जाऊन न्याय संपादन करीत असत. अशोकाच्या काळातील महत्वाचे आधिकारी त्यांची कार्य खालीलप्रमाणे असत.

**नगराध्यक्ष** : नगरात शांतता व्यवस्था ठेवणारा.

**नायक** : हा ' नगररक्षक ' असे , नगराच्या रक्षणाची जबाबदारी याची असे.

**दुर्गपाल** : दुर्गाच्या सुरक्षेची जबाबदारी दुर्गपालाची असे.

**दंडपाल** : पोलीस व्यवस्थेचा प्रमुख असे.

**व्यवहारीक** : हा मुख्य न्यायधिश असे.

**गुढ पुरुष** : हे गुप्तहेर असत ,हे संपुर्ण राज्यात विखुरलेले असत.

**पुरुष** : अशोकाकालीन प्रशासनाचा सर्वोच्च अधिकारी 'पुरुष' असे. त्यातूनच परिषदेच्या सदस्यांची नेमणूक केली जात असे.

**प्रतिवेदक** : संदेशवाहक तसेच दुत'. [५०]

अशोकाच्या काळात माहामात्रो नंतर सामाजिक , अर्थिक तसेच धार्मीक प्रशासन नियंत्रणा करीता अध्यक्ष असत. अर्थशास्त्रात अशा ३० अध्यक्षांचा उल्लेख मिळतो. त्यांना सहाय्य करण्यासाठी उपाध्यक्ष व कर्मचारी असत. स्पर्धापरिक्षेद्वारे यांची निवड केली जात असे. यापैकी पारपत्र अधिक्षक, दारुबंदी अधिक्षक, जुगार प्रतिबंध अधिक्षक, वाणिज्य अधिक्षक हे पोलीस व्यवस्थेचे कार्य करीत असत. वाणिज्य अधिक्षकच्या पुर्वपरवानगी शिवाय जुन्या किंवा वापरलेल्या वस्तु विक्री करता येत नसत. [५१] त्यामुळे चोरांना चोरीचा माल विक्री करणे फारच अवघड होते जवळजवळ अशक्य होते.

<u>**मौर्योत्तर काळातील पोलीस व्यवस्था :**</u> सम्राट अशोकाच्या मृत्युनंतर मौर्य साम्राज्याचा हास सुरु झाला. अशोकानंतरचे राजे कर्तृत्ववान नसल्याने शेवटचा राजा बृहद्रथ याचा पराभव करुन शुंग घराणे सत्तेवर आले. पुष्यमित्र शुंग हा राजा झाला. त्यावेळेस भारतात वायव्य भागात ग्रीकांनी राज्ये स्थापन केलेली होती. अशोकाच्या साम्राज्यानंतर कालांतराने गुप्तहेर संघटन कमजोर होत गेले त्यामूळे राज्यातील शांतता व सुरक्षाव्यवस्था स्थिती खालावत गेली तसेच अंतर्गत वाद वाढत गेले, परकिय आक्रमणांनी साम्राज्य अधिकच खिळखिळे झाले. इ.स. पूर्व पहिल्या शतकात दक्षिण पूर्व भारतात सातवाहन राजांचे शासन होते ,त्यांच्या शासन काळात सैन्याब-लची माहीती मिळते परंतु पोलीस व्यवस्थेब-ल माहीती मिळत नाही. दरम्यान इ.स.पूर्व २०० आणि इ.स.पूर्व १०० च्या मध्ये उत्तरेकडून परकिय ,आक्रमणे झाली व ते भारतात स्थायिक झाले. त्यमध्ये ग्रीक, पर्शीयन, शक आणि कुषाण हे होते. या सर्वांचा भारतीय संस्कृतीवर फार मोठा प्रभाव पडला परंतु यांनी सुद्धा पोलीस व्यवस्थेत काही सुधारणा केल्याचे आढळत नाही. नंतर इ.स.चौथ्या शतकात गुप्त वंशाच्या साम्राजाचा प्रारंभ झाला, हे साम्राज्य दोनशे वर्षापेक्षा जास्त काळ टिकले. गुप्त साम्राज्य काळास सुवर्णकाळ देखील म्हटले जाते. गुप्त काळात अत्यंत चांगली पोलीस व्यवस्था होती. त्यामूळे राज्यात शांतता व सुरक्षा व्यवस्था चांगली होती.[५२] भिटा येथे दंडनायकाच्या मोहरा मोठ्या प्रमाणात मिळाल्या आहेत. बृहत्फ़लायन लेखांमध्ये याचे वर्णन मिळते. दंडनायक हे शांतताव सुरक्षा ठेवण्याकामी स्थानिक अधिकायांना मदत करण्यासाठी विभीन्न जिल्ह्यात ठेवलेल्या सैनिक तुकड्यांचे नायक असण्याची शक्यता वाटते. प्राचीन काळातील उत्तरेतील बयाच राजवंशाच्या दप्तरात 'दंडपाशिक','चोरोधरण','आरक्षाधिकृतो', 'गौल्मिको' या पोलीस व्यवस्थेतील अधिकायांची माहीती मिळते. 'दंडपाशिक' हा पोलीस प्रमुख असे. अपराध्यांना पकडणे , न्यायालयात हजर करणे अशी यांची कामे होती. तसेच गुप्तहेर व्यवस्थेतील कामे देखील करीत असत. त्या अधिन काम करणारे 'चाट' आणि 'भाट' हे पोलीस शिपाई असत. [५३]

गुप्त काळात देखील शासनाचा सर्वोच्च अधिकारी सम्राट हाच असे. गुप्त काळात राजाची कर्तव्या मध्ये आपल्या प्रदेशात कायदा व सुव्यवस्था राखने हे महत्वाची कार्य हते. गुप्त काळातील शासन व्यवस्थेत मौर्य,सातवाहन,शक तसेच कुषाणांची प्रशासन व्यवस्थेतील बयाच परंपरा चालू होत्या. प्रशासना करीता राजाच्य मदतीला केंद्रिय स्तरावर मंत्री आणि अमात्य असत. गुप्त काळात 'कुमारामत्य' हा शासना च्या सेवेतील सर्वात मोठा अधिकारी असे. साम्राज्यातील प्रादेशिक विभागास 'देश' असे म्हणत. साम्राज्यातील केंद्रिय प्रशासन हे अनेक विभागात विभाजीत केलेले असे. प्रत्येक विभागाकरीता वेगवेगळे अधिकारी नेमलेले असत. त्यापैकी पोलीस व्यवस्थेचा सर्वोच्च अधिकारी 'दंडपाशिक' हा असे. 'महाबलाधिकृत' हा न्यायाधिश असे.[५४] केंद्रातील विविध विभागांना 'अधिकरण' म्हटले जात होते. प्रत्येकाची स्वतंत्र मुद्रा होती. त्यांना रोख स्वरुपात वेतन दिले जात होते. मंत्री परिषदेतील प्रधान मंत्र्यास 'मंत्रीमुख्य' म्हणत असत. प्रशासनाच्या सुविधेकरीता साम्राज्य विविध प्रांता मध्ये विभागण्यात आलेले होते. प्रांताना 'भुक्ती' किंवा 'देश' म्हटले जात असे. प्रांतीय शासकांची नियुक्ती सम्राट करीत असे त्यांना

'उपरिक', 'गोप्ता' , 'भोगपती' आणि 'राजस्थानीय' म्हटले जात असे.[५५] गुप्त साम्राज्य काळात पोलीस व्यवस्थेतील अधिकायाला 'चौरोधारनीक' असे संबोधले जात असे. चोरांना जेरबंद करणे हे त्याचे महत्वाचे कार्य असे. पालांच्या काळात देखील आपणास असे आढळते.[५६] प्रांताची विभागणी जिल्ह्यात होत असे त्यास ' विषय' असे म्हणत. 'विषयपती ' हा जिल्ह्याचे प्रशासन पहात असे. त्यास मदतीला 'विषयपरिषद' असे. हे जिल्ह्यातील शांतता व सुरक्षा परिस्थिती हाताळत असत.

**स्थानिय प्रशासन :** गुप्त काळात स्थानीय प्रशासन दोन विभागात विभागलेले होते.

१) नगरप्रशासन २) ग्राम प्रशासन

नगर प्रशासनाच्या प्रमुखास 'पुरपाल' , 'नगरीक ' किंवा 'द्रांगिक ' म्हटले जात होते. हा नगरपरिषदे च्या साहायाने नगराची शांतता व सुरक्षा तसेच सर्व नागरी सुरक्षा पाहाण्याचे कार्य करीत असे.[५७] गुप्त साम्राज्य हे अशोकाच्या साम्राज्यापेक्षा लहान होते. परंतु गुप्त काळातील शासन त्यांच्या नितीमुळे सुदृढ झालेले होते. त्यांनी केंद्रिय स्तरावर पोलीस व्यवस्था निर्माण केली होती. गुप्त काळात पोलीस विभाग हा सम्राटाच्या नियंत्रणात असे. नंतर हूणांच्या आक्रमनामुळे पोलीस व्यवस्था मागे पडली तरी देखील ग्राम तसेच पौर जनपद हे आपआपल्या क्षेत्राची रक्षा तसेच जनतेमध्ये शांतता व्यवस्था ठेवण्याचे कार्य करीत राहीले.[५८]

दंडपाशिक : पोलीस व्यवस्थेच्या सर्वोच्च आधिकायास दंडपाशिक म्हणत असत त्याच्या हाताखाली गुप्तहेर विभागाचे अधिकारी 'चोरोद्धारणिक' , 'दूत' इ. कर्मचारी असत. पोलीस शिपायास 'भाट' म्हणत असत. [५९]

चिनी यात्री फ़हियान याने केलेल्या वर्णनामध्ये चंद्रगुप्त विक्रमादित्य (३७६-४१५) च्या काळातील पोलीस व्यवस्थेचे वर्णन केलेले आढळते. त्याने लिहीले आहे की, भारतात शांतता असे लोक चोर,डाकू तसेच इतर कोणाच्याही भयाविना संपूर्ण देशात फिरु शकत होते. न्यायालयीन व्यवस्था देखील पर्याप्त स्वरुपात कार्य करीत होती. [६०]

नगरपरीषदेच्या प्रमुखास 'नगरपती' म्हटले जात असे. गुप्त काळात 'ग्राम' हे प्रशासनातील शेवटची शाखा असे. प्रत्येक 'विषया' अंतर्गत अनेक 'ग्राम' असत. 'ग्राम' च्या समुहास 'पेय' म्हटले जात असे.म्हणजेच ग्राम नंतर पेय नंतर विषय जसे गांव-तालुका-जिल्हा यासारखे असे. 'ग्राम' चे प्रशासन बघण्याची जबाबदारी 'ग्रमिक' किंवा ' ग्रामपती' ची असे. याच्या मदतीला 'ग्रामपंचायत' असे. हे सर्व मिळून गावात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापीत करीत असत तसेच चोरी व गुन्ह्यांना पायबंद घालीत असत, ही जबाबदारी संपूर्ण गावाची,ग्रामपंचायत व ग्रामपतीची असे.[६१] गुप्त काळात न्याय व्यवस्था देखील बयापैकी होती.

न्यायालयाचे चार वर्ग होते.

१)राजाचे न्यायालय २) पूग ३) श्रेणी ४) हूल.

गुप्तकाळातील दंड विधान कठोर होते. 'दंडनायक', 'सर्वदंडनायक' आणि 'महादंडनायक' हे न्यायाधीश असत. [६२] खालच्या स्वरुपातील न्यायनिवाडा ग्रामपंचायत, नगरपरीषद देखील करीत असत. गुप्तकाळात 'पुराण' तसेच 'नारद' , 'कात्यायन', 'पराशर' , 'बृहस्पती' , इ.स्मृतींची रचना करण्यात आली होती. तसेच 'कुमारसंभव','मेघदूत', 'ऋतुसंहार' आणि 'अभिज्ञान शाकुंतल' सारख्या रचना देखील गुप्तकाळातीलच आहे.या साहीत्यातून देखील आपणास गुप्तकाळातील पोलीस व्यवस्थे विषयी माहिती मिळते. गुप्तकाळात देखील महसूल व पोलीस व्यवस्था वेग-वेगळी नव्हती. महसूल आणि पोलीस व्यवस्था ही 'उपरिका' , 'दशपराधिका' ,'चोरोध्दोरणीक','दंडिका','दंडपाशीक','गौतमीक','कोटपाल' किंवा 'कौट्टुपाल','अंगरक्षक','अयुक्ताका', 'व्हीनियुक्तका','रजुका' इ. अधिकायांकडे असे.[६३] गुप्त साम्राज्य काळात प्रथमिक स्वरुपातील स्वतंत्र पोलीस व्यवस्था होती याची खात्री आपणास विशाखदत्ता यांच्या 'मुद्राराक्षस' नावाच्या नाटकामधून होते. त्या काळातील गुन्हे विषयक कायद्यांची कार्यक्षमता कलास्पा आणि दंडास्पा यांचेद्वारे स्पष्ट करण्यात आलेली आहे. तसेच कार्यकारी(executive) आणि न्यायविषयक(judicial) अधिकार एकाच व्यक्तीच्या हाती असत. गुप्त साम्राज्य दिर्घकाल स्थिर होते.त्यामूळे त्यांची पोलीस व्यवस्था कार्यक्षम होती. पोलीस व्यवस्थेध्ये दंडनायक,महादंडनायक यासारखी पोलीस व्यवस्थेतील अधिकारी कार्यरत होते. त्यांच्या कार्याचा ठसा आपणास राजा शुद्रकाने लिहिलेले 'मृच्छकटिक' आणि विशाखदत्त यांचे 'मुद्राराक्षस' या संस्कृत कलाकृतीमध्ये पहावयास मिळते. मृच्छकटिक नाटकात वसंतसेनेची हत्या पुष्पकरण्डकोद्यानात झाल्याची तक्रार शकाराकडून येताच अधिकरणिच्या तोंडून उदगार निघतो,'अहो, नगररक्षिणां प्रमादःl आणि नगराबाहेर जाणाया बैलगाड्या वीरक (रक्षक) अडवुन तपासतो. तात्पर्य , प्राचीन काळापासून रक्षक दिवसा व रात्रीही गस्त घालीत असत आणि काही संशय आल्यास त्यांना वाहनांची , दुकानांची वा व्यक्तींची झडतीही घेता येत असे. कालीदासाच्या 'अभिज्ञानशाकुंतल' या नाटका मध्ये देखील आपणास त्याकाळची पोलीस व्यवस्था स्पष्टपणे जाणवते.[६४] त्याकाळात देखील पोलीस लाठी हाती घेऊन गस्त घालीत असत. गुन्ह्यांचा तपास करीत

असत हे आपणास कालीदासाच्या 'अभिज्ञानशाकुंतल ' नाटकामध्ये पाहवयास मिळते, पोलीस हियाच्या अंगठीचा शोध घेतांना दिसतात, गुप्तहेर पुरावे गोळा करतांना दिसतात.[६५] संशयित पुरुष असो वा स्त्री त्यांना पोलीस ताब्यात घेत असत.राज्यात पोलीस व्यवस्थेचे कार्य,गुप्तहेरांचे कार्य व्यवस्थितपणे नियंत्रित होते.पोलीस व्यवस्था राज्य शासनाच्या अखत्यारीत असलेली महत्वाची बाब होती. त्याकाळीही पोलीस गुन्ह्यांचा तपास करीत असत,गुन्हेगारांना जेरबंद करणे,गुन्हेगारांना न्यायालयात हजर करणे, न्यायाधिशांनी गुन्हेगाराला दिलेल्या शिक्षेची अंमलबजावणी करणे इ.कामे करीत असत. त्याकाळी पोलीसांचे बरेचसे नियंत्रण हे गुप्तहेरांकरवी केले जात होते.[६६]

**गुप्तोत्तर काळ : वर्धन राजवंश :** सम्राट हर्षवर्धन प्राचीन भारतातील गौरवशाली शासकांच्या परंपरेतील शेवटचा प्रतापी सम्राट होता. तो सफल योद्धा, पराक्रमी विजेता, उत्तम शासक तसेच प्रजावत्सल आणि धर्मपरायण सम्राट होता.साम्राज्याचा मुख्य सुत्रधार सम्राटच होता. त्याच्याच हाती शासनाची सर्व शक्ती होती. साम्राज्याची रक्षा आणि शासन करतांना सदैव जागरुक राहणे त्याचे काम होते. सम्राट हर्षवर्धनाने आपले विशाल साम्राज्य संचलीत करण्याकरीता संघटित अशी शासन पद्धती अवलंबली होती.

**पोलीस व्यवस्था व न्याय व्यवस्था :** साम्राज्याच्या अंतर्गत शांतता व सुरक्षा व्यवस्थेकरीता हर्षवर्धनाने पोलीस व्यवस्था गठित केलेली होती. पोलीस व्यवस्थेमध्ये 'दंडपाशिक', 'दंडीक','चोरोध्दोरणीक', इ. कर्मचारी वर्ग होता. रात्रीच्या वेळी पहारा देणाया स्त्रीला 'ग्रामचेती' असे म्हणत. [६७] सम्राटाकडे गुप्तहेर संघटन देखील कार्यरत होते. हर्षाचे दंड विधान कठोर होते. त्याच्या न्याय व्यवस्थेची तुलना मौर्य काळातील न्याय व्यवस्थे बरोबरी केली जात होती. राजद्रोह तसेच कायद्या विरुद्ध गुन्हा करणायास जन्मठेप अथवा मृत्युदंड शिक्षा दिला जात असे. व्याभिचार करणाया गुन्हेगारास हात,पाय,नाक किंवा कान कलम करण्याची शिक्षा दिली जात होती. [६८] लहान-सहान गुन्ह्यांना अर्थिक दंड केला जात असे. संशयीत गुन्हेगार दोशी आहे किंवा नाही याचे परिक्षण विष,जल, अग्नी इ.च्या व्यवहाराने केले जात असे. सम्राटाकडे मोठा उत्सव अथवा आनंदी प्रसंग असल्यास कारागृहातील कैद्यांची शिक्षा माफ केली जात असे. म्हणजेच त्याकाळात कारागृह अस्तित्वात होते. गुन्ह्याची फिर्याद घेणे ,गुन्हेगारास पकडणे, गुन्हेगारास न्यायालया पुढे हजर करणे, गुन्हेगारास शिक्षा फर्मावल्यानंतर शिक्षेची अंमलबजावणी करणे इ.कामे पोलीस व्यवस्थेकडे होती. यावरुण हर्षवर्धनाच्या काळात पोलीस व्यवस्था उत्तमरित्या कार्यरत होती हे सिद्ध होते. [६९]

**मंत्रिपरीषद :** हर्षवर्धनाने प्रशासनाच्या सुविधेकरीता मंत्रिपरीषदेची स्थापना केलेली होती. राजा स्वतः मत्र्यांच्या नेमणूका करीत असे. राजाच्या निर्णयात मंत्रिपरीषद महत्वाची भूमिका बजावत असे. मत्र्यांना त्यांच्या वेतनापोटी शेतजमीन दिली जात असे. राज्यात जमीनीचा एक चर्थुथांश भाग सरकारी कर्मचायांच्या वेतना करीता सुरक्षित ठेवला जात असे. केंद्रिय शासन व्यवस्थेमध्ये अनेक विभाग असत प्रत्येक विभागास अध्यक्ष अथवा मंत्री असे. राजाच्या खाजगी आधिकायामंध्ये प्रतिहार , विनयासूर जो अगंतुकांना राजसभेत घेऊन जात असे, स्थपती जो कर्मचायांचा निरीक्षक,प्रतिनर्तक,दूतक,लेखक,इ.होते.मंत्रीपरिषदे मध्ये पुरोहीत, प्रधानमंत्री,सांधिविग्रहिक,अक्षपटलाधिकृत,सेनापती यांचे मुख्य स्थान रहात असे. अर्थ तसेच न्याय विधी करिता देखील मंत्री होते. यांच्या व्यतीरिक्त महाबलाधिकृत, अश्वसेनाध्यक्ष, गजसेनाध्यक्ष,दूत,आयुक्त, मीमांसक,भौगिक,दीर्घव्दग,इ. प्रमुख होते. [७०]

**प्रांतिय शासन :** शासन सुविधेकरीता संपूर्ण साम्राज्य प्रांत,विषय,ग्राम,इ. मध्ये विभागलेले असे. प्रातांना 'भुक्ती' असे म्हटले जात होते आणि त्यांच्या शासकास 'राजस्थानीय' , 'गोप्ता', 'भोगपती','उपरिक' ,'महाराज' असे म्हणत.[७१] परंतु प्रांताच्या सेवेत प्रांतपालाच्या आधिन असलेल्या अधिकायांची निवड प्रांतपाल स्वतः करीत असत. प्रांताची विभागणी 'विषया' (जिल्हा) मध्ये केलेली असे आणि त्याच्या शासकास 'विषयपति' असे संबोधले जात होते. यांची नेमणूक प्रांतीय शासक करीत असे. प्रांत तसेच विषयाच्या शासन सेवेत दंडीक,चौरोद्धरिणीक, दंडपाशिक इ. असत.[७२] विषय 'पठक' (तालूका) मध्ये विभागलेले असत आणि 'पठक ' हे 'ग्राम' मध्ये विभागलेले असत. सर्वात खालचे प्रशासनाचे ठिकाण 'ग्राम' असे. 'ग्राम' च्या शासन व्यवस्थेकरीता ग्रामपंचायत असे. [७३]

**ग्राम शासन :** हर्षाच्या काळात ग्राम शासन व्यवस्था चांगली होती. 'ग्राम' सेवेकरीता 'महत्तर' नावाची अधिकारी व्यक्ती असे. जो गावाच्या प्रमुखाच्या भुमिकेत गावाच्या सर्व व्यवहारांची देखरेख करीत असे. 'आग्रहारीक' पदाची व्यक्ती गावातील दान केलेल्या जमीनीची व्यवस्था ठेवत असे. 'ग्रामिक' हाच गावच्या शासनाचा प्रमुख असे. त्याच्याकडेच गावाच्या शांतता व्यवस्थेची म्हणजे पोलीस व्यवस्थेची जबाबदारी असे. 'अष्टकलाधिकरण' हा छोट्या आठ विभागांची देखरेख करीत असे.[७४] हर्षवर्धनाच्या पश्चात गुर्जर-प्रतिहार तसेच पाल राजांच्या कार्यकाळात केंद्रिय पोलीस अधिकायास 'दंडपाशिक' असे संबोधले जात असे. राजमहालाचा प्रमुख रक्षक 'महाप्रतिहार' तसेच नगराच्या रक्षकास 'कोटपाल' संबोधले जात असे. राष्ट्रकूटांच्या काळात ग्राम

पोलीस व्यवस्थेचे काम करणायास 'ग्राम-महत्तर' तसेच नगराच्या पोलीस व्यवस्थेचे काम पहाणायास 'नगरपती' म्हणून संबोधले जात होते. [७५]

:: तळटीपा ::


१) संपादक,रो.दुसार, दक्षता,दिवाळी अंक,२०१६,मुंबई.
२) तर्कतिर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी,मराठी विश्वकोश, खंड १२, पृ.४०.
३) S.Subramanian, Welcome to Police Service,1993, Page No.1.
४) A.Sharma,R.Sharma, Police Administration in India,New Delhi,2015, Page No.9.
५) अ.रा.कुलकर्णी,प्राचीन भारत,स्नेहवर्धन प्रकाशन,पुणे,२००७,पृ.२०३.
६) Choudhari, Dr.Mrinmaya, Laanguishing for Justice, Dattsons,Nagpur,Page No.106.
७) G.Shah,Image Makers,Abhinav Publications,New Delhi,1993, Page No.13.
८) D.Bharti,Police & People , New Delhi,2006, Page No.11.
९) Choudhari, Dr.Mrinmaya, Languishing for Justice,1995, Page No.106.
१०) M. Rama, Legal and Constitutional History of India,Vol.I, Page No.319.
११) Ibid, Page No.321.
१२) ज.उमराणीकर,पोलीस सुधारणा,ब्लू बर्ड लि.,पुणे,पृ.५.
१३) हि.देशभ्रतार, निवृत्त पो.कल्याण संस्था सहावा वर्धपान दिन विषेशांक, २०१६, पृ.९.
१४) M.B.Chande, The Police In India, Atlantic Publishers & Distributors New Delhi,1997, P.55.
१५) Ibid, Page No.55.
१६) K.K.Mishra,Police Administration In Ancient India,Mittal Pub.Delhi,1987, Page No.7.
१७) D.H.Bayley, The Police and Political Development in India,New Jersey,1969, P.37.
१८) A.Sharma,R.Sharma, Police Administration in India,New Delhi,2015, Page No.9.
१९) Ibid, Page No.10.
२०) M.B.Chande, The Police In India, New Delhi,1997, Page No.55.
२१) A.Sharma,R.Sharma, Police Administration in India,New Delhi,2015, Page No.10.
२२) M.B.Chande, The Police In India, New Delhi,1997, Page No.55.
२३) Ibid, Page No.56.
२४) Ibid.
२५) U.N.Ghoshal, A History of Indian Public Life, London,1966, Page No.132.
२६) M.B.Chande, The Police In India, New Delhi,1997, Page No.57.
२७) K.K.Mishra,Police Administration In Ancient India,Delhi,1987, Page No.20.
२८) Ibid, Page No.21.
२९) M.B.Chande, The Police In India, New Delhi,1997, Page No.58.
३०) K.K.Mishra,Police Administration In Ancient India,Delhi,1987, Page No.21.
३१) A.Sharma,R.Sharma, Police Administration in India,New Delhi,2015, Page No.12.
३२) Ibid.
३३) Ibid, Page No.13.
३४) Editor IGP,M.P.Police, History of Madhya Pradesh Police,Bhopal,1965, Page No.6.
३५) A.Sharma,R.Sharma, Police Administration in India,New Delhi,2015, Page No.13.
३६) P.Griffiths, The history of the Indian Police, Ernest Benn ltd., London, 1971,P.11.
३७) शामराव घाडगे, प्राचीन भारताचा इतिहास,कैलास पब्लिकेशन्स,पुणे,२००४.
३८) G.Shaha, History and Organisation of Indian Police,New Delhi,1999, Page No.24.
३९) Editor IGP,M.P.Police, History of Madhya Pradesh Police,Bhopal,1965, Page No.5.

४०) Ibid, Page No.7.
४१) ए. सॉरीकवाल,महिला पुलिस, नवी दिल्ली, २००९,पृ.३२.
४२) कित्ता.
४३) M.B.Chande, The Police In India, New Delhi,1997, Page No.57.
४४) आर.एस.यादव, आधुनिक भारतमें पुलिस व्यवस्था,पृ.१३.
४५) कित्ता.
४६) M.B.Chande, The Police In India, New Delhi,1997, Page No.57.
४७) प.वर्मा,भारतिय पुलिस, पृ.२.
४८) कित्ता.
४९) G.Shaha, History and Organisation of Indian Police,New Delhi,1999, Page No.19.
५०) एस.सेंगर,प्राचीन भारत का इतिहास,पृ.३१५.
५१) कित्ता.
५२) K.K.Mishra, Police Administration in Ancient India,Delhi, 1987, Page No.19.
५३) एस.सेंगर,प्राचीन भारत का इतिहास,पृ.३२०.
५४) कित्ता,पृ.३१५.
५५) कित्ता,पृ.३१८.
५६) Choudhari, Dr.Mrinmaya, Loanguishing for Justice,1995, Page No.106
५७) एस.सेंगर,प्राचीन भारत का इतिहास,पृ.३१८.
५८) आर.एस.यादव, आधुनिक भारतमें पुलिस व्यवस्था,पृ.१३.
५९) A.Sharma,R.Sharma, Police Administration in India,New Delhe,2015, Page No.32.
६०) www.bharatdiscovery.org.
६१) www.bharatdiscovery.org.
६२) www.bharatdiscovery.org.
६३) G.Shaha, History and Organisation of Indian Police,New Delhi,1999, Page No.23.
६४) Ibid, Page No.24.
६५) Ibid, Page No.24.
६६) प्राचीन भारत का राजनीतीक और सांस्कृतीक इतिहास,पृ.२०७.
६७) कित्ता.
६८) कित्ता.
६९) कित्ता,पृ.२००
७०) कित्ता.
७१) कित्ता.
७२) कित्ता.
७३) कित्ता.
७४) आर.एस.यादव, आधुनिक भारतमें पुलिस व्यवस्था,पृ.१३.
७५) कित्ता.